श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी
बांधकाम विभाग,
दिनांक :- ०९, डिसेंबर , २०१९

प्रति
**मा. मुख्य कार्यकारी अधिकारी,**
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी
यांचे सेवेशी

## ❖ चालु असलेले प्रकल्प

**१. श्री साईबाबा मंदिर शिर्डी दर्शन रांग इमारत बांधकाम करणे .**

शिर्डी येथे श्री साईंच्या दर्शनासाठी येणा-या साईभक्तांच्या वाढत्या गर्दीचे नियोजनासाठी व भक्तांना दर्शन सुलभ, सोयीस्कर व्हावे, दर्शनरांगेत भक्तांना सर्व सुविधा उपलब्ध व्हाव्यात या दृष्टीने मंदिर व जुने प्रसादालय परिसराचे पुन:र्नियोजन करण्याचा निर्णय मा. व्यवस्थापन समितीने घेतलेला आहे. या पुनर्विकास प्रकल्पात साईभक्तांना सुधारीत दर्शन रांग, प्रतिक्षा हॉल, स्वच्छतागृह, चप्पल स्टॅण्ड, फस्ट एड सेंटर, सुरक्षा तपासणी, मोबाईल व लगेज लॉकर्स, सेंट्रल ए.सी, शुध्द पिण्याचे पाणी, बुकस्टॉल, कापडकोठी, लाडू प्रसाद काऊंटर्स, देणगी काऊंटर्स, स्नॅक्स काउंटर, फायर लिफ्ट, पॅसेंजर लिफट आदि सुविधांचा तसेच सुरक्षेच्या दृष्टीने आवश्यक त्या सर्व बाबी समाविष्ट करुन नविन दर्शन रांग प्रकल्पाचे काम हाती घेण्यात आले असून याकामी रु.१०९.५० कोटी मात्र इतका खर्च अपेक्षित आहे. याकामी ठेकेदार यांना कार्यादेश देण्यात आला आहे. सदरहु प्रकल्पाचे भूमीपुजन मा. पंतप्रधान, भारत सरकार श्री. नरेंद्र मोदी यांचे हस्ते दि. १९/१०/२०१८ रोजी करण्यात आले असून सदर काम प्रगतीपथावर आहे.

**२.नविन शैक्षणिक संकुलाची उभारणी करणे.**

श्री साईबाबा इंग्लीश मिडीयम स्कूल, कन्या विद्यामंदिर, संस्थान महाविद्यालय यांचेकरीता स्वंतत्र इमारतीचे बांधकाम ५,८८,२९६ चौ.फुट जागेत तयार करणेत येणार असून त्याच बरोबर १०५० क्षमतेचे ऑडीटोरीयम व स्वतंत्र जिमखाना तयार करणेत येत आहे. सदरहु इमारतीचे बांधकाम ठेकेदार यांचेमार्फत सुरु आहे. याकामी रक्कम रुपये २१८ कोटी मात्र इतका खर्च येणार आहे.

**३. साईबाबा भक्तनिवासस्थान इमारतीचे खोल्यांचे नूतनीकरण करणे.**

साईबाबा भक्तनिवासस्थान इमारतीचे बांधकाम सन १९९४ मध्ये झालेले होते. सततचे वापरामुळे सदरहू खोल्याचे रंगकाम, फ्लोरींग, दरवाजे, खिडक्या, प्लबींग फिटींग तसेच टॉयलेट बाथरुम खराब झालेले असल्याने सन २०१०-११ मध्ये १०० खोल्याचे नूतनीकरण करणेत आले आहे. उर्वरीत ३८६ खोल्यांसह इमारतीचे नूतनीकरण करणे आवश्यक होते. सदरहु खोल्याचे नूतनीकरण करणेकामी ठेकेदार यांना रु.१३.०८ कोटी रकमेचा कार्यादेश देण्यात आला असून काम प्रगती पथावर आहे.

**४. श्री साईनाथ रुग्णालय इमारतींवर वाढीव तिस-या मजल्याचे बांधकाम करणे.**

दिवसेंदिवस वाढती रुग्णाची गर्दी लक्षात घेता उपलब्ध असलेल्या सोयी सुविधा या अपु-या पडत असल्याने रुग्णाना पुरेशाप्रमाणात सुविधा देणे अडचणीचे होत आहे. याकरीता श्री साईनाथ रुग्णालय इमारतींवर अतिरिक्त तिस-या मजल्याचे बांधकाम सुरु आहे. याकामी रक्कम रु.३.९९ कोटी मात्र इतका खर्च येणार आहे.

**५. साईआश्रम भक्तनिवास येथील खोल्यांचे रंगकाम व दुरुस्तीचे काम करणे.**

साईआश्रम भक्तनिवास मध्ये १५३६ खोल्या आहेत. सदरहू इमारतीचे बांधकाम सन-२०१२ मध्ये पूर्ण झालेले आहे. सदर खोल्यांचे आतील रंगकाम, टॉयलेट बाथरुमचे दरवाजे, रुममधील आरशे, फ्लश व्हॉल्व, तसेच सहा इमारतीचे पॉलीकार्बोनेट डोम दुरुस्तीचे काम सुरु आहे. याकामी रक्कम रु.४.८३ कोटी मात्र इतका खर्च येणार आहे.

**६. सर्व्हे नं. १२५ व १२६ मधील संस्थानचे जागेत संरक्षक भिंतीचे बांधकाम करणे.**

संस्थान मालकीचे सर्व्हे नं. १२५ व १२६ जागेत ५३८ मीटर कम्पौंड वॉल भिंतीचे काम ठेकेदार यांचेमार्फत सुरु असून सदरहु काम पूर्णत्वावर आहे. याकामी रक्कम रुपये ४१.४७ लक्ष मात्र इतका खर्च अपेक्षीत आहे.

**७. संस्थानचे शांतीनिवास इमारतीचे दुस-या व तिस-या मजल्यावरील प्रशासकीय कार्यालय पॅसेज व जिन्यामध्ये असलेले कोटा फ्लोरींग काढून त्या ठिकाणी ग्रेनाईट फ्लोरींग करणे.**

संस्थानचे शांतीनिवास इमारतीचे दुस-या व तिस-या मजल्यावरील प्रशासकीय कार्यालय पॅसेज व जिन्यामध्ये असलेले कोटा फ्लोरींग काढून

त्या ठिकाणी ग्रेनाईट फ्लोरींग करणेचे काम ठेकेदार यांचेमार्फत प्रगतीपथावर असून याकामी रक्कम रुपये १२.७९ लक्ष मात्र इतका खर्च अपेक्षीत आहे.

८. **संस्थानचे साई उद्यान इमारतीमधील हॉलकडील बाजुचे टॉयलेट ब्लॉक नुतनीकरण करणे .**

संस्थानचे साई उद्यान इमारतीमधील हॉलकडील बाजुचे टॉयलेट नूतनीकरणाचे काम हाती घेण्यात आले असून टॉयलेट ब्लॉक मधील जुनी फ्लोरींग काढून त्या ठिकाणी नवीन व्हट्रीफाईट फ्लोरींग बसविणे, वॉटर प्रुफींग करणे, संडास भांडे बदलणे, नविन प्लंबींग फिक्चर्स बसविणे, पी.व्ही;सी पॅनल दरवाजे बसविणे, ड्रेनेज लाईन बदलणे, सी.पी.व्ही.सी पाईप लाईन टाकणेचे काम करणेसाठी ठेकेदार यांना कार्यादेश देण्यात आला असून सदरहू काम प्रगतीपथावर आहे. याकामी रक्कम रुपये २७.३० लक्ष मात्र इतका खर्च अपेक्षीत आहे.

९. **मंदिर परिसरातील साईसत्यव्रत हॉलचे पहिल्या मजल्यावर ध्यान मंदिराचे बांधकाम करणे.**

श्रींचे दर्शनासाठी येणा-या साईभक्तांना ध्यान धारणा करणेकामी मंदिर परिसरातील साईसत्यव्रत हॉलचे पहिल्या मजल्यावर ध्यान मंदिर तयार करणेकामी प्रिकास्ट काँक्रीट ब्लॉक बांधकाम ॲकॉस्टीक दरवाजे व खिडक्या बसविणे फॉल्स सिलींग, वॉल पॅनेलींग करणे वातानुकुलन यंत्रणा व विद्युत कामे पूर्ण करणेत आली आहेत. याकामी रक्कम रु. ४०.०० लक्ष मात्र इतका खर्च संस्थानकडील निधीतून करणे अपेक्षीत आहे.

## ❖ विश्वस्तव्यवस्थेचे नियोजीत विकास प्रकल्प

१. **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी व शिर्डी नगरपंचायत यांचे संयुक्त वापरासाठी संस्थान निधीतून घनकचरा प्रक्रिया प्रकल्प निमगांव को-हाळे गट नं.१८२ मधिल संस्थान मालकीचे जागेत उभारणे.**

संस्थान परिसरातील व शिर्डी शहरातील निघणारा दैनंदिन कच-याचे व्यवस्थापन करण्याची सुविधा उपलब्ध नसल्याने श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी व शिर्डी नगरपंचायत यांचे संयुक्त वापरासाठी संस्थान निधीतून घनकचरा प्रक्रिया प्रकल्प मौ. निमगांव-को-हाळे गट नं.१८२ मधिल संस्थान मालकीचे जागेत १० टी.पी.डी. क्षमतेचा घनकचरा

प्रकल्प उभारणे प्रस्तावीत असून याकामी रककम रु.४.३५ कोटी मात्र इतका खर्च अपेक्षीत आहे.

**२. साई नॉलेज पार्क प्रकल्प उभारणे.**

श्री साईभक्तांचे मनोरंजनासाठी व त्यांना श्रींचे जीवनचरित्राविषयी माहिति उपलब्ध व्हावी यासाठी बाबांचे जीवन चरित्रावर आधारीत चलचित्राद्वारे व मुर्त्यांच्या आधारे देखावे यांनी युक्त साईसृष्टी उभारणे, प्लॅनेटोरीयम तसेच नामांकीत संतांचे व राष्ट्र पुरूषांचे ० हॅक्स म्यूजीयम इ. सुविधा निर्माण करून साई नॉलेज पार्क  प्रकल्प उभारणेसाठी सल्लागार म्हणून श्री. संदिप शिक्रे ॲण्ड असो., मुंबई यांची नेमणूक करण्यात आली आहे. याकामी अंदाजे रक्कम रु.१६६.३९ कोटी मात्र इतका खर्च अपेक्षीत आहे.

**३. लाडू व बुंदी प्रोसेसिंग युनिट**

मौजे निमगांव को-हाळे येथील येथील संस्थानचे गट नं. ८७/८८ मधील जागेत लाडू व बुंदी प्रसाद निर्मिती व्यवस्थेकरीता इमारतीचे बांधकाम करण्यात येणार  असून त्यामध्ये बंदी व लाडू किचन, थर्मोफ्लयुडी हिटींग सिस्टीम, कोल्ड स्टोअरेज, सब स्टोअर, ऑनलाईन बेसन चक्की, बेसन मिक्सींग, लाडू सुकविणे व पॅकिंग इ. सुविधांचा त्यामध्ये समावेश करण्यात येणार आहे. याकामी रक्कम रु.२९.७३ कोटी इतका खर्च अपेक्षित आहे. इमारतीचे बांधकाम क्षेत्र ५६७१.६० चौ.मी. इतके आहे.

**४. साईनाथ रुग्णालयातील टॉयलेट बाथरुम  नूतनीकरण करणे**

साईनाथ रुग्णालयातील टॉयलेट इमारतीमधील टॉयलेट बाथरुमचे नूतनीकरण करणे प्रस्तावीत आहे. याकामी आर्किटेक्ट यांची नेमणुक करण्यात आली असून रु १.३१ कोटी मात्र खर्च अपेक्षीत आहे.

**५. श्री साईबाबा समाधी मंदिर व पुरातन वारसा इमारतींचे सुद्दढीकरण करणे.**

श्री साईबाबा समाधी मंदिर, द्वारकामाई, चावडी आणि दिक्षीतवाडा या ऐतिहासीक वास्तुंचे सुद्दढीकरण करणेसाठी  सल्लागार यांनी रु.२.०८ कोटी मात्र रक्कमेचे अंदाजपत्रक सादर केले आहे.

**६. संस्थानचे मौजे निमगांव को-हाळे येथिल गट नं. २४५ पै. मधिल साठवण तलावाकरीता पाईप लाईन टाकणे**

संस्थानचे मौजे निमगांव को-हाळे येथिल गट नं. २४५ मध्ये देणगीस्वरुपात ६५ एम एल क्षमतेच्या नविन साठवण तलावाची निर्मिती करण्यात आलेली आहे. सदर साठवण तलावास कॅनॉल पासून डी.आय. पाईपलाईन टाकणे,

मिटर रुम बांधकाम करणे, इनलेट वेल गेटसह बांधकाम करणे प्रस्तावीत आहे. त्यासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचे सल्ल्याने अंदाजपत्रक तयार करणेत येत आहे.

## ❖ संस्थानमार्फत अर्थ सहाय्य केलेले सार्वजनिक विकास प्रकल्प

**१. शिर्डी नगरपंचायत हद्दीतील प्रथम प्राधान्य गटातील उर्वरीत रस्त्यांची कामे पूर्ण करणे**

संस्थानचे आर्थीक निधीतून शिर्डी नगरपंचायत हद्दीतील प्रथम प्राधान्य गटातील ११ रस्त्यांपैकी रस्ता क्र. ०५ चे काम बाकी असल्याने सदरहू काम संस्थान मार्फत ई-निविदा प्रक्रिया राबवून पूर्ण करुन घेण्यात आले असून याकामी रक्कम रु.१.४९ कोटी मात्र इतका खर्च आलेला आहे. सदरहु खर्च संस्थान निधीतून करण्यात आलेला आहे. तसेच उर्वरीत रस्ता ९ अ चे भूसंपादनासाठी रु.२७.५३ कोटी रक्कम शिर्डी नगरपंचायतीकडे जमा करण्यात आली आहे.

**२. शिर्डी नगरपंचायत हद्दीतील DP Plan मधील ६ रस्त्याचे भूसंपादन करणे व भूसंपादनाची आवश्यकता नसलेले उर्वरीत ३ रस्ते विकसीत करणे.**

शिर्डी नगरपंचायत हद्दीतील ०६ रस्ते भूसंपादनासाठी रक्कम रु. १६३.५५ कोटी मात्र इतका खर्चास मा. व्यवस्थापन समितीचे सभेत मान्यता देण्यात आली आहे. तसेच भूसंपादनाची आवश्यकता नसलेले ३ रस्ते विकसीत करणेसाठी रु. १५ कोटी खर्चास व्यवस्थापन समितीची मान्यता देण्यात आली आहे.

**३. शिर्डी शहरातील २४ रस्ते विकसन करणे –**

शिर्डी शहरातील विविध ठिकाणचे २४ अंतर्गत रस्ते विकसीत करणेस शासनाने रु.८.९८ कोटी खर्चास मान्यता दिली आहे.

**४. शिर्डी वाहतुक आराखड्यातील ०४ रस्ते विकसीत करणे**

शिर्डी वाहतुक आराखड्यातील ०४ रस्ते विकसीत करणेसाठी रु.१.८८ कोटी खर्चास मा. व्यवस्थपन समितीने मान्यता दिली आहे.

**५. शिर्डी बसस्थानक व भक्तनिवास इमारतीस अग्नीशमन यंत्रणा बसविणे**

श्री क्षेत्र शिर्डी येथे श्रीसाईंच्या दर्शनासाठी देश-विदेशातून हजारो साईभक्त दररोज येत असतात.या साईभक्तांना निवारा, प्रसादभोजन या मूलभूत सोयी सुविधांबरोबरच इतर अनुषंगिक सेवा, संस्थान व्यवस्थापनामार्फत उपलब्ध करुन देण्यात येत आहेत. या प्रयत्नाचाच एक भाग म्हणून मा. व्यवस्थापन समितीने विविध निर्णयान्वये श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचे आर्थिक सहकार्यातून महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाचे मालकीच्या शिर्डी येथील जमिनीत बसस्थानक तथा भक्तनिवास अद्यावत सोयींनी युक्त बसस्थानकाचे काम पूर्ण करण्यात आले आहे. सदरहु इमारतीमध्ये अग्नीशमन यंत्रणा बसविणेकामी ११.३६ लक्ष मात्र इतका खर्च येणार आहे. सदरचे काम प्रगतीपथावर आहे.

**६. शिर्डी बसस्थानक व भक्तनिवास इमारतीतील मध्यवर्ती ओपन टु स्काय भागावर पॉलीकार्बोनेट डोमचे छत तयार करणे**

संस्थानचे आर्थिक सहय्यातून महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाचे मालकीच्या भुखंडावर शिर्डी बसस्थानक व त्यावरील इमारतीचे बांधकाम ठेकेदार यांचेमार्फत पूर्ण करण्यात आले आहे. सदरहू बसस्थानक व भक्तनिवास इमारतीतील मध्यवर्ती ओपन टु स्काय भागावर पॉलीकार्बोनेट डोमचे छत तयार करणेकामी ठेकेदार यांना कार्यादेश देण्यात आला असून कामास लवकरात सुरुवात होणार आहे; याकामी रक्कम रु.६.९३/- लक्ष मात्र इतका इतका खर्च संस्थानकडील निधीतून करणेत येणार आहे.

**७. शिर्डी बसस्थानक व भक्तनिवास इमारती मध्ये रेनवॉटर हार्व्हेस्टिंग योजना राबविणे.**

संस्थानचे आर्थिक सहय्यातून महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाचे मालकीच्या भुखंडावर शिर्डी बसस्थानक इमारतीचे बांधकाम करण्यात आले असून सदरहू इमारतीवरील पावसाचे पाणी एकत्रीत करुन जमिनीचे भूजल पातळी वाढणेस मदत होणे कामी रेनवॉटर हार्व्हेस्टिंग प्रकल्पाचे काम हाती घेण्यात येणार आहे. सदरहु काम करणेकामी अंदाजे रु.१.९४ लक्ष मात्र इतका खर्च अपेक्षीत आहे.

अभियंता-
१)---------------------
२)---------------------
३)----------------------
४)-------------------------

१) --------------------------
(श्री. एस.एम. जोरी )
उप अभियंता,

२) --------------------------
(श्री. डी.एम. देसाई )
उप अभियंता,

(श्री.आर.बी. आहेर)
**प्र. कार्यकारी अभियंता,**
३श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी